महाराष्ट्र शासन

क्रमांक : गौखनि -४७/०६१९/प्र.क्र.८५/ख

महसूल व वन विभाग
हुतात्मा राजगुरू चौक,
मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक : ३०/०७/२०१९

विषय : गौण खनिज - यवतमाळ
संपूर्ण रेती घाट, ता. महागाव, जि. यवतमाळ या वाळूगटाची अनामत रक्कम परत करणेबाबत.
श्री. राजू सव्वालाखे

शासन ज्ञापन:

जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना त्यांचे पत्र क्र. कावी/खनिकर्म/भौ.मा.प्र.सहा/२०१९/३३६ दि. ३०.५.२०१९ व अ.शा. पत्र क्र. कावी/खनिकर्म/भौ.मा.प्र.सहा/२०१९/४४७ दि. १६.७.२०१९ च्या उपरोक्त विषयावरील पत्रास अनुलक्षून असे कळविण्यात येते की, सन २०१३-१४ करिता महागाव तालुक्यातील संपूर्ण घाट या वाळूगटाकरीता श्री राजु सव्वालाखे यांनी अनामत रक्कम (EMD) रु. ७,२६,९१८/- भरणा केली होती. तसेच त्यांनी सर्वोच्च बोली रु. १,३५,८२,९९९/- बोलली होती. तथापि, लिलावधारक यांनी वाळूगटाची उर्वरीत रक्कम विहित मुदतीत न भरल्यामुळे जिल्हाधिकारी, यवतमाळ यांनी दि. २५/०२/२०१४ च्या आदेशान्वये अनामत रक्कम जप्त करण्यात आली.

सदर आदेशाविरुध्द लिलावधारक यांनी अपर आयुक्त अमरावती यांचेकडे दाखल केलेल्या अपिलावर अपर आयुक्त, अमरावती यांनी दि. २२/०४/२०१६ रोजी आदेश पारीत करुन जिल्हाधिकारी, यवतमाळ यांचा आदेश रद्द केला. सदर आदेशाविरुध्द विभागीय आयुक्त, अमरावती यांचेकडे दाखल पुनरावलोकन अर्जावर विभागीय आयुक्त, अमरावती यांनी अपर आयुक्त अमरावती यांचे दि. २२/०४/२०१६ रोजीचे आदेश दि. ०९/०२/२०१८ च्या आदेशान्वये रद्द केले. आयुक्त अमरावती यांच्या दि. ०९/०२/२०१८ रोजीच्या आदेशाविरुध्द लिलावधारक यांनी मा. मुंबई उच्च न्यायालय, खंडपीठ नागपूर येथे रिट पिटीशन क्र. १५२७/२०१८ दाखल केले. मा. उच्च न्यायालयाने दि. १८/०४/२०१९ रोजी याचिकाकर्त्याने भरलेली इसारा रक्कम (EMD) आदेशाचे दिनांकापासून सहा आठवड्यात देण्याचे आदेश दिलेले आहेत. त्याअनुषंगाने श्री. राजू सव्वालाखे यांना रु.७,२६,९१८/- एवढया रकमेचा परतावा करण्याचा शासनाने निर्णय घेतला आहे.

२. सबब, लिलावधारक श्री. राजू सव्वालाखे यांना रु.७,२६,९१८/- **(रुपये सात लाख सव्वीस हजार नऊशे अठरा फक्त)** इतकी रक्कम, त्यांनी लिलावाची रक्कम प्रत्यक्षात शासनाकडे जमा केल्याची व यापूर्वी ही रक्कम अदा केलेली नाही, याची खातरजमा करुन घेण्याच्या अटीवर अदा करण्यास या शासन ज्ञापनाद्वारे शासनाची मान्यता देण्यात येत आहे.

३. याबाबीवर होणारा खर्च सन २०१९-२० यावर्षाकरीता लेखाशिर्ष, ०८५३ - अलोहयुक्त खाणी व धातुशास्त्रीय उद्योग "१०२ - खनिजबाबत सवलत फी व स्वामित्वधन, ९००, अलोहयुक्त खाणकाम व धातुशास्त्रीय उद्योग - वजा परतावे (००) (०१) वजा परतावे (०८५३ ००८६) खाली उपलब्ध असलेल्या अंदापत्रकीय तरतूदीमधून खर्ची टाकून भागविण्यात यावा.

४. सदर ज्ञापन वित्त विभागाच्या सहमतीने त्या विभागाचा अनौपचारीक संदर्भ क्रमांक २४९/२०१९/व्यय-९, दिनांक १७/०६/२०१९ अनुसार दिलेल्या सहमतीनुसार निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन ज्ञापन महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१९०७३०१६१००७२७१९ असा आहे. हे ज्ञापन डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करून काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

Dinesh Rohidas Chavan

Digitally signed by Dinesh Rohidas Chavan
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=Revenue and Forest Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=c0edee7a8805e86e41846cf28cf151b9ce48bb88ebf4f2e8a7fc10e8dcad98ec, serialNumber=8c2377ed235498603821d49922a210871ff6fb9b369722ac707aee7dcd87f2bd, cn=Dinesh Rohidas Chavan
Date: 2019.07.30 16:19:59 +05'30'

(दिनेश चव्हाण)
अवर सचिव
महसूल व वन विभाग

प्रति,

जिल्हाधिकारी यवतमाळ, यवतमाळ.

प्रत:

१) विभागीय आयुक्त, अमरावती विभाग, अमरावती.
२) प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-२, नागपूर.
३) प्रधान महालेखापाल (लेखापरीक्षा)-२, नागपूर.
४) जिल्हा कोषागार अधिकारी यवतमाळ, यवतमाळ.
५) वित्त विभाग, (व्यय-९, अर्थसंकल्प -३, ६ व १४ कार्यासने) हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
६) कार्यासन अधिकारी (ब-१ कार्यासन) महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.
७) निवडनस्ती ख कार्यासन, महसूल व वन विभाग, हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई -३२.